SPPL

*Shelters today*
*for better tomorrows!*

# शिवशाही पुनवर्सन प्रकल्प लिमिटेड .

( ही पूर्णत ः महाराष्ट्र शासनाच्या मालकीची असलेली कंपनी)

गृह निर्माण भवन, 5 वा मजला, वांद्रा (पुर्व), मुंबई - 400 051 .

☏ 26591087/0588 . ईमेलः sppl_mumbai@rediffmail.com; वेबसाईटः www.sppl.biz

## सूचना

## माटुंगा लेबर कँप, धारावी येथील उर्वरित सदनिकांची आणि दुकानांची विक्री

(9 जून 2009 आणि 10 जून 2009 रोजीच्या आवृत्तीत प्रकाशित केलेल्या आधीच्या 'प्रकाशित जाहिरातीच्या शुद्धिपत्रा'च्या पुढे)

शिवशाही पुनवर्सन प्रकल्प लिमिटेड (एसपीपीएल - ही पूर्णत ः महाराष्ट्र शासनाच्या मालकीची असलेली कंपनी) यांनी, माटुंगा लेबर कँप (एमएलसी) येथील जी नॉर्थ, मुंबई - 17 प्रभागातील धारावी विभागाच्या सी . एस . क्रं . 25 (हिस्सा), 45 (हिस्सा) आणि 55 (हिस्सा) ह्या भूखंडांवरील आपल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत एम3, एम2 आणि एम1 ह्या तळमजला + 7 मजली आरसीसी इमारतींमधील उर्वरित 23 सदनिका आणि 15 दुकानांच्या विक्रीसाठी 29 मे 2009 च्या प्रकाशनाद्वारे सीलबंद बोली / ऑफर्स मागविल्या होत्या .

तथापि, 9 जून 2009 आणि 10 जून 2009 रोजी आवृत्तीमध्ये प्रकाशित माहितीच्या अन्वये ही विक्री प्रक्रिया म्हणजे सीलबंद बोली उघडण्याची तारीख पुढे ढकलण्यास आली होती . सूचनेमध्ये हेही नमूद केलेले होते की सदनिकांसाठी आणि दुकानांसाठी सीलबंद बोली / ऑफर्स उघडण्याचे सुधारित दिनांक सध्याचे विधानसभेचे अधिवेशन संपल्यानंतर जाहीर करण्यात येतील .

शासन निर्णयाप्रमाणे महाराष्ट्रात किमान 15 वर्षे वास्तव्याची अट सदर सीलबंद निविदाना पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू करता येईल का यावर कायदेतज्ञांनी तसे, करता येत नाही असे मत दिले व त्या संदर्भात असे नमुद केले आहे की कारण त्या स्वीकृत झालेल्यावर अटींमध्ये भर/दुरुस्ती करण्याचे अधिकार एसपीपीएल ला देणारे असे कोणतेही कलम निविदा सूचनेमध्ये नाही. म्हणून विधितज्ज्ञांच्या मतानुसार एसपीपीएल उर्वरित सदनिकांच्या/दुकानांच्या विक्रीसाठीची संपूर्ण निविदा/बोली प्रक्रिया त्या मागे घेत आहे, जिच्यासाठी 9 आणि 10 जून 2009 पर्यंत बोळी प्राप्त झालेल्या असून ज्या अनुक्रमे 10 आणि 12 जून 2009 रोजी उघडण्यात येणार होत्या. म्हणून एसपीपीएल कार्यालयात ज्या बोली न उघडता पडून आहेत त्या रद्द समजण्यात येत आहेत .

वरीलप्रमाणे निविदा मागे घेऊन रद्द केलेली असल्याने अर्जदारांना/बोलीदारांना (ज्यांनी त्यांच्या सीलबंद बोली सदनिकांच्या आणि दुकानांच्या खरेदीसाठी सादर केलेल्या आहेत त्यांना) याद्वारे कळविण्यात आणि विनंती करण्यात येते की त्यांनी इसारा रकमेची आपली/आपला प्रत्येकी रु. 50,000/- ची पे ऑर्डर/डी.डी. एसपीपीएलच्या लेखा विभागातून, त्या साठी मिळालेल्या मूळ पावती च्या बदलात दि. 3 अगस्त 2009 पासून पुढे कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सादर करून घेऊन जावी/जावा.

एसपीपीएल ह्या सूचनेद्वारे, माटुंगा लेबर कैम्प (एमएलसी) येथील जी नॉर्थ, मुंबई - 17 प्रभागातील धारावी विभागाच्या सी . एस . क्र, 25 (हिस्सा), 45 (हिस्सा), 55 (हिस्सा) ह्या भूखंडांवरील आपल्या झोपड़पटटी पुनर्वसन योजने अतर्गत एम 3 एम 2 आणि एम 1 ह्या तळमजला + 7 मजली आरसीसी इमारतींमधील उर्वरित 23 सदनिका आणि 15 दुकानांच्या विक्रीसाठी नव्याने अर्ज मागवित आहे.

1 सदनिकांच्या आणि दुकानांच्या इच्छुक खरेदीदारांनी अर्जाचे (ची) कोरे (री) प्रपत्र (त्रे) 7 अगस्त 2009 रोजी किंवा तत्पूर्वी सदनिकेसाठी किंवा प्रत्येक दुकानासाठी अर्जाच्या प्रत्येक कोऱ्या प्रपत्रासाठी रु. 250/- (रोख) भरून ( अर्जाचे शुल्क अपरतावायोग्य आहे). कोरी पप्रपत्रे विक्रीसाठी जनरल मॅनेजर (मार्केटिंग) ह्यांचे कार्यालय, शिवशाही पुनर्वसन प्रकल्प लिमिटेड, 5 वा मजला, गृह निर्माण भवन, बांद्रे पूर्व, मुंबई . 51 येथे स. 11 . 00 ते सायं. 5 . 00 ह्या वेळात कामकाजाच्या सर्व दिवशी उपलब्ध असतील. कोऱ्या आवेदन प्रपत्रांची विक्री 4 अगस्त 2009 पासून सुरू होईल,

2 हे पुन्हा एकदा कळविण्यात येत आहे की:

(अ) प्रत्येकी 362 चौ.फू.बांधीत क्षेत्र असलेल्या 1 एचके च्या फक्त चार सदनिका विक्रीसाठी उपलब्ध असून त्या 1ल्या, 6व्या आणि 7व्या मजल्यावर आहेत आणि विभिन्न बांधीत क्षेत्राची 6 दुकाने एम 3 इमारतीच्या तळमजल्यावर आहेत.एम 3 ही विक्री इमारत असून त्यातील 39 सदनिका या अगोदरच विकण्यात आलेल्या आहेत आणि उक्त इमारत त्या सदनिकाधारकांच्या नोंदणीकृत संस्थेकडे हस्तांतरित करण्यात आलेली आहे.

(ब) तथापि एम 1 इमारतीमध्ये तळमजल्यावरच्या फक्त 2 सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत आणि 17 सदनिका + 9 दुकाने एम 2 इमारतीच्या तळमजल्यावर आणि पहिल्या मजल्यावर विक्रीसाठी उपलब्ध आहेत. (एम 1 आणि एम 2) इमारती आहेत इमारती म्हणजे विक्री पुनर्वसन इमारती आहेत.

3 उर्वरित सदनिकांची आणि दुकानांची विक्री **सीलबंद बोली/निविदा तत्त्वाने** केली जाईल.

4 सदनिकांसाठी मूलभूत दर (हातची किंमत ) विकीयोग्य बांधीत साठी **रु. 2,350** प्र.चौ.फू. निश्चित केलेला असून दूकानांसाठी मूलभूत दर विक्रीयोग्य बांधीत साठी **रु. 4,620** प्र. चौ. फू. निश्चित केलेला आहे.

**टीप** ः प्रत्त्येक सदनिकेचे आणि दुकांनाचे चटई क्षेत्र अर्जाच्या प़पत्रात /पुस्तिकेत दिलेले आहे.

5 सदनिकांच्या आणि दुकांनाच्या इच्छुक खरेदीदारांनी आपल्या ऑफरची बोली वर (4) मध्ये दिलेल्या मूलभूत दराहून अधिक लावायची आहे . वितरणाची ऑफर संबंधित सदनिकेसाठी किंवा दुकानासाठी सर्वोच्च बोली लावणायाला दिली जाईल .

6 रीतसर भरलेली अर्जाची सीलबंद प्रपत्रे सदविकांसाठी सादर करण्याचा अंतिम दिनांक **11 ऑगस्ट 2009** आणि दुकानांसाठी हा अंतिम दिनांक **13 ऑगस्ट 2009** असा ठेवण्यात आला असून सदनिकांसाठी अर्जाची ही सीलबंद प्रपत्रे दिनांक **12 ऑगस्ट 2009** रोजी घरांसाठी तर दुकांनासाठी ती **14 ऑगस्ट 2009** रोजी एसपीपीलच्या कार्यालयात उघ्दडण्यात येतील. इच्छुक अर्जदार अनुक्रमे सदनिकांच्या आणि दुकांनाच्यासाठीच्या सीलबंद बोली उघ्दडण्याच्या वेळी उपस्थित राहू शकतात .

7 (अ) ह्या सीलबंद बोली उघ्दडल्यानंतर यशस्वी बोलीदाराने त्याच्या/तिच्या महाराष्ट्रातील गेल्या किमान 15 वर्षाच्या अखंडित वास्तव्याचा कागदोपत्री पुरावा (अधिवास प्रमाणपत्र) तीस दिवसात सादर करणे आवश्यक आहे अन्यथा ती ऑफर /बोली तावडतोब नाकारण्यात येईल .

(ब) कोणतेही कारण न देता अर्ज स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार एसपीपील राखून टेवीत आहे .

या सूचनेच्या आणि अर्जाच्या प्रपत्रांतर्गत दिलेल्या सर्व अटींचे पालन करणाऱ्या फक्त सर्वोच्च बोलीदारालाच सदनिकेसाठी किंवा दुकानासाठीच्या या यशस्वी बोलीकरिता त्याच्या/तिच्या नावावर स्वीकृत पत्र निर्गमित करण्यासाठी पात्र समजण्यात येईल .

8 इसाऱ्याची रक्कम, जागेचा आराखडा, स्थळदर्शक आराखडा, युनिट प्लॅन, टिपिकल प्लॅन,. विक्री कार्यपध्दती, विक्रीयोग्य बांधकामक्षेत्र, चटई क्षेत्र, हातची किंमत, आरक्षित रक्कम आणि अटी व शर्ती यासंबधी सविस्तर माहिती अनुक्रमे सदनिकांसाठीच्या आणि दूकानांसाठीच्या अर्जाच्या प्रपत्रामध्ये दिलेली आहे .

स्वाक्षरीत/-
महाप्रबंधक (विपणन)

सं. एसपीपीएल/जीएम (मार्केटिंग) /एमएलसी/1065/2009

दिंनाक: 31-07-2009

*SPPL do not have any Mar keting / Selling Agency / Agents.*